# मॅन्युअल -१७

## इतर उपयुक्त माहिती

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रतीदिन अंदाजे ३७५० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जातो. यातील ८०% पाणी उपयोगांती मलजलात प्रवर्तित होते. पर्यावरण संतुलनासाठी मलजल संकलित करुन त्याची सुयोग्य विल्हेवाट लावणे आवश्यक असते. तसेच जलप्रदुषण प्रतिबंध कायदा तसेच पर्यावरण रक्षण कायद्यातील तरतूदींचे पालन करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे.

एकूण बृहन्मुंबई परिसर हा सात मलनि:सारण झोनमध्ये विभागलेला आहे. जे कुलाबा, वरळी, बांद्रा, वर्सोवा, मालाड, भांडुप आणि घाटकोपर असे आहेत. मलजलाचे एकत्रिकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाटीच्या दृष्टिकोनातुन कुलाबा, वरळी आणि वांद्रे या विभागातील प्रक्रिया केलेले मलजल समुद्रांतर्गत स्वतंत्र पातमुखाद्वारे अरबी समुद्रात सोडले जाते. वर्सोवा विभागातील सांडपाणी हे मालाड खाडीत विसर्जित होते. त्याचप्रमाणे भांडुप आणि घाटकोपर विभागातील मलजल हे मलनि:सारण प्रक्रिया सुविधा अंतर्गत वातीत तलावांमध्ये प्रक्रिया करुन ठाणे खाडीमध्ये सोडण्यात येते.

**आकडेवारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मलवाहिन्यांची लांबी | - | १९७३ कि(सर्वआकाराच्या) .मी. |
| २ | मॅनहोल संख्या | - | ७१,००० |
| ३ | मलजोडण्या | - | ३,४९,०००२०१७.ऑक्टो) च्या सर्वेक्षणानुसार( |
| ४ | मलजल उदंचन केंद्रे | - | ५० |
| ५ | उदंचन केंद्राची एकूण स्थापित क्षमता | - | ५,५७९ एम .डी.एल. |
| ६ | क्षम्य उत्सर्जन व विल्हेवाट | - | २७२७एम ४..एल.डी. |
| ७ | प्रत्यक्ष उत्सर्जन व विल्हेवाट | - | १४४३ एम.डी.एल. |
| ८ | कर्मचारी संख्या | - | अ६ -मलनि:सारण प्रचालन (,५५७<br>ब७८८ -परिवहन ( |

मलनि:सारण प्रचालन खाते वरील खात्यांनी उभारलेली सांडपाणी व्यवस्था प्रचलित आणि परिरक्षित करते त्याचबरोबर हे खाते काही जुजबी स्वरुपाची कामे जसे की, छोटया आकाराच्या

मलवाहिनीचे मोठया आकाराच्या मलवाहिनीत रुपांतर करणे, मलवाहिनीवरील मॅनहोलची उंची वाढवणे, व्हॅट शाफ्टचे स्थानांतरण करणे, नादुरुस्त मलवाहिनीची दुरुस्ती करणे, इ. पण करते. तसेच जुन्या व मोडकळीस आलेल्या मलवाहिन्यांच्या पुन:स्थापनाची विविध कामे पण ह्या खात्यांमार्फत केली जातात. या खात्यातर्फे बृहन्मुंबईच्या सर्व पाणी पुरवठा व मलनि:सारण खात्यांना लागणा-या वाहनांचा पुरवठा व त्याचे प्रचालन आणि परिरक्षण केले जाते. हे खाते महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प 'ग' अंतर्गत येते.

<u>**कार्यप्रणाली:-**</u>

खात्याच्या कामाचे प्रामुख्याने खालील चार भाग पडतात.

१. मलवाहिन्या अ) नलिका मल वाहिन्या (१८ इंचापेक्षा कमी आकारमानाच्या)

ब) मुख्य मलवाहिन्या (१८ इंच व त्यापेक्षा जास्त आकारमानाच्या)

२. उदंचन,प्रक्रिया व विल्हेवाट

३. परिवहन सेवा

४. मोडकळीस आलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या कामाचे नियोजन व बांधकाम

उदा. १. मलवाहिन्यांची स्थिती अवलोकन करणे.

२. मलवाहिन्यांचे पुन:स्थितीकरण करणे.

नलिका मल वाहिन्यांची व्यवस्थाही मुख्यतत्वे नागरिकांशी प्रत्यक्ष संबंधित बाब आहे. प्रथेनुसार संबंधित प्रभाग कार्यालयाकडुन यांचे परिरक्षण होते. मुख्य मलवाहिन्यांच्या तक्रारींचे परिशिलन या खात्याच्या मध्यवर्ती यंत्रणेद्वारा म्हणजे या खात्याकडून केले जाते.

मलनि:सारण प्रचालन विषयक विविध तक्रारींची नोंद ही संबंधित प्रभाग कार्यालयात किंवा मलनि:सारण प्रचालन खात्याच्या तीन मध्यवर्ती नियंत्रण कक्षात केले जाऊ शकते. दूरध्वनी क्रमांक या दैनंदिनीत स्वतंत्रपणे दिलेले आहेत. इंटरनेटद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर व दुरध्वनी क्रमांक १९१६ वर पण तक्रारींची नोंद करता येते.

या खात्याच्या मुख्य मलनि:सारण विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून मुख्य मलवाहिन्यांची कालबध्द साफसफाई केली जाते. बहुतांश कामाचे यांत्रिकीकरण केलेले आहे

आणि सुरक्षा विषयक सर्व दक्षता घेतली जाते. यंत्रसामग्रीचे परिरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कार्यशाळा अस्तित्वात आहेत. खालील यंत्र सामग्रीचा वापर केला जातो.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जेटींग मशीन्स | : | ५ |
| २. | गली एम्टिअर | : | १६ |
| ३. | मड सकर मशिन्स | : | २० |
| ४. | पॉवर बकेट मशीन्स | : | २६ |
| ५. | चोक मशिन पॉवर ) (रॉडिंग | : | ३१ |
| ६. | रिसायक्लिंग मशीन्स | : | १० |
| ७ | ग्रॅब मशीन्स | : | ०८ |

बृहन्मुंबईमध्ये परसलेल्या भुयारी गटारांच्या जाळ्यांमध्ये व जागोजागच्या उदंचन केंद्राच्या माध्यमातून सांडपाणी मुख्य उदंचन केंद्र व प्रक्रिया केंद्राकडे प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाटीसाठी आणले जाते.